21-02-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 02/20/2025 11:30 PM Page 1



# शिवाजी महाराजामुळेच गोव्यातील हिंदुत्व टिकून राहिले

## मुख्यमंत्री डॉ. सावंत : शिवजयंतीनिमित्त न्हावेली साखळीत मोटरसायकल रॅली

टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. २० :** हिंदवी स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवत असतानाच गोव्यात पोर्तुगीजांकडून होत असलेल्या धर्मांतरणावर अंकुश लावणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांमुळेच गोव्यातील हिंदुत्व टिकून व अबाधित राहिले. अशा या थोर नेत्याची जयंती म्हणजे एक मोठा उत्सव असून आज या उत्सवात संपूर्ण गोवा न्हाऊन निघतो, ही एक मोठ्या समाधानाची व अभिमानाची बाब आहे. अशा राजाचे नेतृत्व व आदर्श प्रत्येकाने आत्मसात करावे, असे आवाहन मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी केले.

न्हावेली येथून आयोजित केलेल्या भव्य मोटरसायकल रॅलीचा मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी बावटा दाखवून शुभारंभ केला. त्यानंतर मुख्यमंत्री बोलत होते. स्वतः मुख्यमंत्री डॉ. सावंत हे एका स्कूटरवर बसून या यात्रेत सहभागीही झाले. ही यात्रा न्हावेली येथून कुडणे, गावठाणमार्गे साखळी शहरात दाखल झाली. बाजारात वळसा घेऊन ही यात्रा रवींद्र भवन परिसरात दाखल होऊन तिची सांगता झाली. यावेळी साखळी मतदारसंघातील सर्व पंचायतींचे सरपंच, उपसरपंच, पंचसदस्य, साखळीचे नगरसेवक यांची उपस्थिती होती.

शिवजयंती निमित्त आयोजित करण्यात आलेल्या दिंडी सादरीकरण स्पर्धेला मोठा प्रतिसाद लाभला. साखळी सरकारी सामाजिक आरोग्य केंद्र ते रवींद्र भवन यादरम्यान महिला दिंडी पथकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन दिंडी सादर केली. साखळी शहरातील संपूर्ण वातावरण शिवमय झाले होते. हजारोच्या संख्येने महिला, पुरुष, युवा यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाचा गजर करीत तसेच घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून सोडला होता.



साखळी : शिवजयंतीनिमित्त न्हावेली साखळीतून काढण्यात आलेल्या मोटरसायकल यात्रेत सहभागी झालेले मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, सोबत जिल्हा पंचायत सदस्य गोपाळ सुर्लकर व इतर.



# रवींद्र भवनात रंगला लोकनृत्याचा उत्सव

टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. २० :** केशव सेवा साधना स्कूल फॉर स्पेशल चिल्ड्रन, वाळपई यांनी गोवा सरकारच्या कला आणि संस्कृती संचालनालयाच्या सहकार्याने रवींद्र भवन, साखळी येथे केशव कला महोत्सव – गोवा लोकनृत्य महोत्सव यशस्वीरीत्या आयोजित केला. हा महोत्सव गोव्यातील विशेष शाळांमधील मुलांची प्रतिभा प्रदर्शित करण्यासाठी आणि गोव्यातील लोकनृत्याच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचा उत्सव साजरा करण्यासाठी समर्पित होता.

उद्घाटन समारंभाला

कला आणि संस्कृतीमंत्री गोविंद गावडे, प्रमुख पाहुणे तसेच सुभाष शिरोडकर, सन्माननीय पाहुणे केशव सेवा साधनाचे अध्यक्ष ॲड. खगेंद्र हेगडे देसाई, सचिव नाना बेहेरे; अध्यक्ष ॲड. सुदिन मराठे, सागर शेट्ये, व्यवस्थापक मकरंद कामत, मैथिली परोब आदी उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर १० वेगवेगळ्या विशेष शाळांमधील विद्यार्थ्यांनी त्यांच्या मंत्रमुग्ध करणाऱ्या लोकनृत्य सादरीकरणाने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. त्यांचे समर्पण, उत्साह आणि कलात्मक अभिव्यक्ती उपस्थित सर्वांना खोलवर भावली. या उत्साही सादरीकरणाने मुलांची नृत्याबद्दलची आवड प्रतिबिंबित झाली आणि समावेशक सांस्कृतिक उत्सवांचे महत्त्व अधोरेखित केले. मुले आणि शाळांमधील प्रचंड सहभाग आणि उत्साहामुळे कार्यक्रम यशस्वी झाला. महोत्सवाचा समारोप समारंभाने झाला. जिथे सर्व सहभागींना त्यांच्या प्रतिभेसाठी आणि उत्कृष्ट कामगिरीसाठी विविध बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले आणि त्यांचे कौतुक करण्यात आले. केशव कला महोत्सव २०२५ हा एक उल्लेखनीय कार्यक्रम होता.

## पान १ वरून

### मोदींच्या भेटीदरम्यान झालेल्या कामांमध्ये भ्रष्टाचार

एसजीपीडीए मैदानातील सुधारणा: रू. ७.२३ कोटी, फातोर्डा येथील कदंबा बसस्थानक आणि डेपो क्षेत्रातील सुधारणा: रू. ४.९४ कोटी, तात्पुरते बसस्थानक आणि हॉटमिक्सिंगसाठी अंदाजे खर्च: रू. १२० कोटी, अशा कामांचा समावेश आहे. पत्रकारांशी संवाद साधताना सावियो यांनी दावा केला की, या सर्व कामांसाठी कोणतीही निविदा प्रक्रिया न करता थेट कंत्राटे देण्यात आली. ते म्हणाले, कदंबा बसस्थानक परिसरात दहा दिवसांसाठी १६ जेसीबी, १६ ट्रक आणि ११५ कामगार तैनात करण्यात आल्याचा दावा केला जात आहे. प्रत्यक्षात मात्र, १ फेब्रुवारी २०२४ रोजीच बहुतांश कामे पूर्ण झाली होती आणि त्यानंतर परिसर सुरक्षेच्या कारणास्तव पूर्णतः बंद करण्यात आला. त्यामुळे हा खर्च अनावश्यक आणि संशयास्पद आहे. कुतिन्हो यांनी असा दावा केला की, या प्रकल्पांसाठी सुमारे १२० कोटी रुपयांचा खर्च करण्यात आला असून, यात मोठा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा संशय आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी झाली पाहिजे आणि भ्रष्टाचारात सहभागी असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी काँग्रेसने केली आहे.

------------

### यूएसएआयडी अनुदानावरून राजकीय वातावरण तापले

समिटमध्ये भारतासाठी दिलेल्या २.१ कोटी डॉलर्सच्या अनुदानावर आक्षेप घेतला. त्यांनी प्रश्न विचारला की, भारतातील मतदारांच्या मतदानावर खर्च करण्यासाठी आम्हाला २१ दशलक्ष डॉलर्स द्यावे लागण्याचे कारण काय ? मला वाटते की हे दुसऱ्या कोणाला तरी निवडून आणण्याचा प्रयत्न होता. ही मोठी समस्या आहे आणि भारत सरकारने याकडे लक्ष द्यायला हवे.ट्रम्प यांनी पुढे म्हटले, भारताकडे स्वतःचा खूप पैसा आहे. ते एक मोठे अर्थव्यवस्थेचे केंद्र आहे. मग आम्ही त्यांच्या मतदारांना पैसे का द्यावेत ? भारत सरकारला यावर उत्तर द्यावे लागेल.या संपूर्ण वादाच्या पार्श्वभूमीवर, अमेरिकेच्या डिपार्टमेंट ऑफ ग्लोबल एंगेजमेंट या विभागाने भारतातील मतदारांच्या मतदानासंदर्भातील प्रयत्नांसाठी वाटप केलेले २१ दशलक्ष डॉलर्सचे अनुदान रद्द केल्याची घोषणा केली आहे.

# शिवरायांच्या विचारातून जीवनात प्रेरणा निर्माण करा : ॲड. देसाई

टीम दैनिक हेराल्ड

**वाळपई, दि.२० :** शिवरायांनी जे स्वराज्य उभे केले त्यामागे एक सुनियोजित योजना होती. स्वराज्य निर्माण करताना आलेल्या अडचणींना शिवराय कधीच घाबरले नाही तर त्या अडचणीतून मार्ग निर्माण केला आणि हिंदवी स्वराज्य उभे केले. शिवरायांचे विचार हे भारत राष्ट्राच्या निर्मितीसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. शिवरायांच्या विचारातून प्रत्येक भारतीयाने प्रेरणा घ्यायला हवी, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध शिवव्याख्याते ॲड. शिवाजी देसाई यांनी केले.

पर्यें सत्तरी येथील श्री भूमिका उच्च माध्यमिक विद्यालयात शिवजयंती निमित्त आयोजित करण्यात आलेल्या शिवचरित्रावरील व्याख्यान कार्यक्रमात प्रमुख वक्ते या नात्याने बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर भूमिका उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य यशवंत सावंत, उपप्राचार्य रावसाहेब राणे, विद्यालयाच्या संस्थेचे व्यवस्थापक शिवाजीराव राणे, शंकर चारी, कुष्टा राणे आदी मान्यवर उपस्थित होते.

ॲड. देसाई म्हणाले की, जेव्हा जेव्हा अनेकवेळा शिवरायांच्या जीवनात लढाया झाल्या, विपरीत प्रसंग आले तेव्हा शिवराय अगोदर स्वतः पुढे राहिले. त्यांनी आपल्या सैन्याचे स्वतः पुढे राहून नेतृत्व केले. माणसाने स्वतःचे ध्येय बाळगताना अडचणींचा कधीही बाऊ करता कामा नये. तर त्या अडचणींना धैर्याने आणि सामर्थ्याने सामोरे जायचे असते हे शिवरायांनी खरे म्हणजे आम्हास शिकविले आहे. आज शिवरायांचे पुतळे अनेक ठिकाणी होत आहेत ही चांगली गोष्ट आहे. परंतु त्याच बरोबर त्या पुतळ्यांचा सन्मान राखला पाहिजे. केवळ एक दिवसा पुरते शिवजयंती करण्यासाठी म्हणून पुतळे असता कामा नये. आपण शिवरायांना ईश्वरा स्वरूप मानतो.

अगदी त्याच पद्धतीने शिवरायांच्या पुतळ्यांची देखील देखभाल व्हायला हवी. विद्यार्थी दशेतच प्रत्येक विद्यार्थ्याला शिवरायांचे विचार समजणे आवश्यक आहे. कारण ह्या दशेतच जेव्हा विद्यार्थ्यांच्या तरुणांच्या मनामध्ये चांगले विचार रुजतात तेव्हा त्यांच्या जीवनाला खरा आकार निर्माण होतो. विद्यार्थ्यांनी मोठी ध्येय बाळगली पाहिजेत. दुसऱ्यासमोर हात पसरण्यापेक्षा स्वतःचे ध्येय स्वतः निर्माण केले पाहिजे हे शिवरायांनी आम्हाला शिकवले आहे. असे ॲड. देसाई शेवटी म्हणाले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांनी ईशस्तवन आणि शिवरायांच्या जीवनावरील पोवाडा सादर केला. कार्यक्रमाचे सूत्रनिवेदन आणि आभार प्रदर्शन प्रसाद केरकर यांनी केले. कार्यक्रमाचे उद्‌घाटन दीप प्रज्वलन आणि शिवरायांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून ॲड. शिवाजी देसाई यांनी केले. कार्यक्रमाला उत्तम प्रतिसाद लाभला.



पर्ये– सत्तरी : येथील शिवजयंती कार्यक्रमाचे उद्‌घाटन करताना ॲड. शिवाजी देसाई. बाजूला रावसाहेब राणे, यशवंत सावंत, कुष्टा राणे, शंकर च्यारी आणि शिवाजीराव राणे.

# संशोधन, प्रश्नावली आराखडा आणि माहिती विश्लेषणावर कार्यशाळा

टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. २०:** संत सोहिरोबानाथ आंबिये कला आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय विर्नोडा येथील वाणिज्य विभागातर्फे दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले होते. संशोधन आराखडा, प्रश्नावली आराखडा आणि माहिती विश्लेषणसाठी वापरावयाची माध्यमे' या विषयावर ही दोन दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आलेली होती. माहिती विश्लेषण आणि संशोधनात्मक लेख प्रसिद्ध करण्याबाबत प्रशिक्षण देऊन एम.कॉम विभागातील विद्यार्थ्यांची संशोधन क्षमता वाढविणे हा या दोन दिवसीय कार्यशाळा आयोजनामागचा महत्त्वाचा हेतू होता. कार्यशाळेच्या सुरुवातीला पदव्युत्तर वाणिज्य विभागाचे समन्वयक डॉ. वीरेंद्र आमोणकर यांनी मान्यवरांचे स्वागत करून कार्यशाळेच्या आयोजनामागची उद्दिष्टे स्पष्ट केली. सूत्रसंचालन करून मान्यवर तज्ज्ञांची ओळख प्रा.श्रीमती नाईक यांनी करून दिली. आभार अपूर्वा नाईक यांनी मानले. या दोन दिवसीय कार्यशाळेचे संपूर्ण आयोजन डॉ. वीरेंद्र आमोणकर यांनी केले.

उच्च शिक्षण संचालनालयातील सहायक संचालक डॉ.कौस्तुभ कामत यांनी माहिती विश्लेषण या विषयावर अभ्यासपूर्ण मांडणी केली. विविध माहिती विश्लेषण तंत्रे आणि संशोधन आराखडा धोरणांची ओळख करून देताना डॉ. कामत यांनी प्रगत विश्लेषणात्मक साधनांचा वापर माहिती विश्लेषणासाठी कसा करावा हे सांगितले.

# आपली संस्कृती अखंडपणे सुरू ठेवा

अध्यक्ष राजेंद्र देसाई : मल्लिकार्जुन देवस्थानच्या देणगी कुपनच्या विजेत्यांना बक्षिसांचे वितरण

टीम दैनिक हेराल्ड

**काणकोण, दि. २० :** गोमंतकीय संस्कृतीबरोबरच धार्मिक कार्यात अग्रेसर असलेले विघ्नहर्ता महागणपतीचे कार्यकर्ते हे खऱ्या अर्थाने अभिनंदनास पात्र आहेत. हे काम करत असताना अनेक संकटे त्यांना आली, त्यावर मात करुन समाजासाठी अहोरात्र काम करताना दहा वर्षापासून ७० वर्षांपर्यंतचे कार्यकर्ते येथे कार्य करत असताना दिसतात. हे सर्व पहाता आपली संस्कृती अखंडपणे चालू राहील, असे उद्‌गार श्री मल्लिकार्जुन देवस्थानचे नवनिर्वाचीत अध्यक्ष राजेंद्र देसाई यांनी काढले.

मल्लिकार्जुन देवस्थानतर्फे काढण्यात आलेल्या देणगी कुपनच्या विजेत्यांना बक्षिसांचे नुकतेच वितरण करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर काणकोणच्या नगराध्यक्षा सारा शंभा नाईक देसाई, गजानन कोमरपंत, कुशाली कोमरंपत व रंगनाथ कोमरपंत उपस्थित होते.

नगराध्यक्षा सारा देसाई म्हणाल्या, या परिसरातील सौंदर्यीकरण करण्यासाठी सर्वतोपरी मी प्रयत्नशील असून नगराध्यक्ष या नात्याने सर्वती मदत करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

यावेळी पाहुण्यांच्या हस्ते देणगी कुपनांच्या विजेत्यांना बक्षिसे वाटण्यात आली. त्यामध्ये उदय दत्ताराम पागी, मनोज सोनू वेळीप, पंकज वेळीप, रामकृष्ण गोविंद घोडेकर, नंदिता देसाई, दिवाकर पागी, मोहम्मद साब्रान, राजेश वेळीप, विजय कोमरपंत यांचा समावेश होता. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन संस्थेचे अध्यक्ष सोयरु कोमरपंत, पाहुण्यांची ओळख सुरेश कुशाली कोमरपंत यांनी करुन दिली तर शेवटी श्रीनिवास कोमरपंत यांनी आभार मानले.

# 'आकाश गोवा'च्या २१ विद्यार्थ्यांना जेईईमध्ये ९० हून अधिक गुण

## स्वरालीला ९९.८९ पर्सेंटाईलसह टॉप स्कोररचा बहुमान

दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २० :** टेस्ट प्रिपरेटरी सेवांमध्ये राष्ट्रीय आघाडीवर असलेल्या आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेड (एईएसएल) ने गएए मेन्स २०२५ (सेशन १) मध्ये विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या उल्लेखनीय यशाची घोषणा केली आहे. स्वराली चौधरी हिने ९९.८९ पर्सेंटाईल मिळवत या परीक्षेच्या पहिल्या सत्रातील टॉप स्कोरर म्हणून नाव कमावले आहे. अन्य प्रमुख यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये अगस्त्य ड्राय (९९.६९ पर्सेंटाईल), लक्ष्य सैनी (९९.३४ पर्सेंटाईल), साहिल (९९.२८ पर्सेंटाईल), निखिल रावत (९८.३८ पर्सेंटाईल) आणि नरसिंहा के नायक (९७.९२ पर्सेंटाईल) यांचा समावेश आहे. ही उत्कृष्ट कामगिरी विद्यार्थ्यांच्या परिश्रमाची आणि शैक्षणिक कौशल्याची साक्ष देते. नॅशनल टेस्टिंग एजन्सीने ११ फेब्रुवारी रोजी निकाल जाहीर केला, यामुळे या वर्षीच्या दोन नियोजित गएए सत्रांपैकी पहिल्या सत्राला अधिकृत सुरुवात झाली आहे.

विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना, आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेडचे मुख्य अकादमिक आणि बिझनेस प्रमुख डॉ. एच. आर. राव म्हणाले, जेईई मेन्स २०२५ मध्ये आमच्या विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाचा आम्हाला अभिमान आहे. त्यांचा मेहनतीचा प्रवास आणि योग्य मार्गदर्शनामुळेच त्यांना हे उत्तम निकाल मिळू शकले. आकाशमध्ये आम्ही विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यावर भर देतो, जेणेकरून ते त्यांच्या संपूर्ण क्षमतेचा विकास करू शकतील. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन आणि त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा!

जेईई (मेन्स) दोन सत्रांमध्ये घेतला जातो, ज्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांचे गुण सुधारण्याची संधी मिळते. जेईई ॲडव्हान्स्ड परीक्षेच्या माध्यमातून केवळ आयआयटी संस्थांमध्ये प्रवेश मिळतो, तर जेईई मेन्सच्या आधारे भारतातील अनेक राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्थांमध्ये आणि इतर केंद्रीय सहाय्यित अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये प्रवेश दिला जातो. जेईई ॲडव्हान्स्ड परीक्षेला बसण्यासाठी विद्यार्थ्यांना गएए मेन्स उत्तीर्ण करणे आवश्यक आहे.

एईएसएल हे वैद्यकीय (नीट) आणि अभियांत्रिकी प्रवेश परीक्षांसाठी (जेईई) तसेच एनटीएसई आणि ऑलिम्पियाडसारख्या स्पर्धा परीक्षांसाठी उत्कृष्ट तयारी कार्यक्रम पुरवणाऱ्या संस्थांपैकी एक म्हणून ओळखले जाते. विद्यार्थ्यांना त्यांच्या संपूर्ण क्षमतेचा विकास करण्यासाठी आणि शैक्षणिक क्षेत्रात यश संपादन करण्यासाठी गुणवत्तापूर्ण परीक्षा तयारी सेवा पुरवणे हे संस्थेचे उद्दिष्ट आहे.

# नावेली येथील लक्ष्मी नारायणाची मूर्ती सतराव्या शतकातील : डॉ. फळगावकर

**देवस्थान समिती करणार पुरातत्त्वीय अवशेषांचे जतन**

टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. १९ :** नावेली–डिचोली येथील लक्ष्मी नारायण–मंदिराची पुनर्बांधणी केली जात आहे. या मंदिरातील पुरातत्त्वीय अवशेषांचे जतन आणि दस्तावेजीकरण करण्यासाठी येथील देवस्थान मंदिर समिती उत्सुक असून या संदर्भात सखोल माहिती आणि अभ्यासासाठी देवस्थान समितीने संत सोहिरोबानाथ आंबिये कला आणि वाणिज्य महाविद्यालय, विर्नोडा येथील पुरातत्त्व अभ्यास केंद्राचे मुख्य समन्वयक डॉ. रोहित फळगावकर यांना निमंत्रित केले होते. यावेळी देवस्थान समितीचे सदस्य प्रेमानंद वसंत गावस, अध्यक्ष चंद्रकांत अपी गावस, सचिव आनंद सीताराम गावस, कोषाध्यक्ष विनायक शभा गावस आदी मान्यवर उपस्थित होते. या मंदिरात लक्ष्मी–नारायण, शिवलिंग, महिषासूरमर्दिनी आणि गणपतीच्या प्राचीन मूर्ती आहेत.

यावेळी बोलताना डॉ. रोहित फळगावकर म्हणाले की, नावेली–डिचोली येथील लक्ष्मी नारायणाची मूर्ती सोळाव्या–सतराव्या शतकातील असून गोव्यातील ही मूर्ती अद्वितीय स्वरूपाची आहे. तिच्या वरच्या डाव्या हातात शंख आणि वरच्या उजव्या हातात चक्र आणि खालच्या उजव्या हातात गदा धरलेली आहे. तिने कानात सर्प कुंडले परिधान केली असून खालच्या उजव्या हातात अक्षमाला दिसते.

लक्ष्मी नारायणाची मूर्ती ही गोव्याच्या इतिहासातील सर्वांत महत्त्वाची पुरातन मूर्ती आहे. कारण त्या मूर्तीत शैव आणि वैष्णव तत्त्वे दिसतात. मूर्तीशास्त्राप्रमाणे वर सांगितलेली आयुधे धरलेल्या क्रमानुसार ही मूर्ती जनार्दनच्या स्वरूपात आहे. जनार्दन हे विष्णूच्या २४ रुपांपैकी एक आहे. महिषासूरमर्दिनी देखील अत्यंत प्राचीन असून महिषासूरमर्दिनी महिषासूराचा वध करताना हातात त्रिशूलाऐवजी तलवार दाखविलेली आहे.



**पुरातत्त्व अभ्यास केंद्रातर्फे आवाहन**

संत सोहिरोबानाथ आंबिये कला आणि वाणिज्य महाविद्यालय विर्नोडा येथील पुरातत्त्व अभ्यास केंद्रार्ते गोव्यातील इतिहास, संस्कृती आणि परंपरा यांचे जतन केले जात आहे. शिक्षण हे समाजाशी जोडले गेले पाहिजे या उदात्त हेतूने महाविद्यालयातील पुरातत्त्व अभ्यास केंद्र गोव्यातील पुरातत्त्व अवशेषांचे जतन करत आहे. गोव्यातील मंदिरे, देवस्थान समिती यांना या संदर्भात कोणतीही मदत हवी असल्यास पुरातत्त्व अभ्यास केंद्राचे मुख्य समन्वयक डॉ. रोहित फळगावकर यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पुरातत्त्व अभ्यास केंद्रातर्फे करण्यात आलेले आहे.


**IN THE COURT OF THE CIVIL JUDGE SENIOR DIVISION & JMFC, VASCO DA GAMA, GOA**

Matrimonial Petition no.**30/2023/A**

Mr. Akash Ashok Naik,
S/o. Mr. Ashok Narayan Naik,
Age 30 years, Service,
r/o. House No.184/9, Behind Vasco Sports Club, Vasco da Gama-Goa
South Goa. ...Petitioner.

**Versus**

Ms. Gayatri Ganapati Naik,
Alias Gayatri Akash Naik,
D/o Ganapti Naik, Age 29 years, Service,
R/o. H.No. L-144, Housing Board Colony,
Near Bhavan's School, Upasngar,
Zuarinagar, Murmugao, Goa.
...Respondent.

**NOTICE**

Notice is given to the public and the litigants that the suit for divorce under section 13(1)(ia) of the Hindu Marriage Act 1955, being Matrimonial Petition no. 68/2020/B filed by the Petitioner against the Respondent stands dissolved by Order and Decree dated 29th day of the month of May, of the year 2023.

The Civil Registrar of Mormugao, Goa, is hereby directed to cancel the marriage of the Petitioner and Respondent under the entry no. **MR-MOR-108-2022,** in the marriage registration book of the year **2022.**

Given under my hand and the seal of the Court, this 24th day of the month of July of the year 2024.

Seal

Sd/-
**(Ashwini Khandolkar)**
Adhoc SCJ & JMFC 'B' Court Vasco
I/c. Adhoc SCJ & JMFC 'A' Court Vasco
Encl: as above

Sandeep Ads



**CHANGE IN NAME**

I **MARIA IVONE DA LUZ FERRAO** R/O HNO 267 FONDVEM RIBANDAR NORTH GOA HAS CHANGED MY NAME FROM **YVONNE FERRAO** TO **MARIA IVONE DA LUZ FERRAO**. HEREAFTER IN ALL MY DEALINGS AND DOCUMENTS AND I WILL BE CALLED OR KNOWN BY THE NAME **MARIA IVONE DA LUZ FERRAO.**



**CHANGE IN NAME**

I, **PARVIN BI USMAN** R/o. 1799/3, Datta Guru Sadan Kranti Nagar, Alto Porvorim Bardez Goa, would like to change my name from **PARVIN BI** TO **PARVIN BI USMAN.** Hereafter in all documents and dealing will be known by the name **PARVIN BI USMAN.**


# आधुनिक जगात बौद्धिक संपदा हक्क ही मौल्यवान संपत्ती..!

## प्रणय प्रभू गावकर : साखळी सरकारी महाविद्यालयात बौद्धिक संपदा हक्कावर विशेष सत्राचे आयोजन

टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. २० :** आधुनिक जगात बौद्धिक संपदा हक्क ही मौल्यवान संपत्ती असून व्यक्ती अथवा संस्था या हक्काच्या आधारे स्वत:चे संरक्षण करू शकतात, असे प्रतिपादन पेटन्ट आणि ट्रेडमार्क तज्ज्ञ प्रणय प्रभू गावकर यांनी केले.

कला, विज्ञान आणि वाणिज्य सरकारी महाविद्यालय साखळी येथील इन्स्टिट्युशन इनोव्हेशन कौन्सिल (आयआयसी) आणि गोवा स्टेट इनोव्हेशन कौन्सिल यांच्या संयुक्त विद्यमाने बौद्धिक संपदा हक्कावर (आयपीआर) आयोजित केलेल्या सत्रात ते मुख्य मार्गदर्शक म्हणून बोलत होते. विद्यार्थ्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनांना चालना देऊन त्यांचे संरक्षण करणे आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देणे हा या सत्राचा उद्देश होता. भूगर्भशास्त्राचे प्रा.दत्तराज जावडेकर यांनी आभार मानले.



साखळी : भूगर्भशास्त्राचे प्रा.दत्तराज जावडेकर, प्रा. नामदेव गावस आणि मुख्य मार्गदर्शक प्रणय प्रभू गावकर व इतर मान्यवर आणि सहभागी.

### नव्या कल्पनांमधून संधी शोधा

**विद्यार्थ्यांनी सातत्याने नव्या कल्पनांमधून संधी शोधली पाहिजे. शैक्षणिक संशोधन आणि उद्योजकता यामध्ये बौद्धिक संपदा अधिकाराचे महत्त्व विशद करतानाच गावस यांनी विद्यार्थ्यांनी उद्योगनिर्मिती संदर्भात संधी शोधल्या पाहिजेत. विद्यार्थ्यांच्या कल्पना आणि शोध यांना कायदेशीर संरक्षण दिले जाईल, असे प्राचार्य गावस यांनी सांगितले.**

बौद्धिक संपदा हक्कावर आयोजित केलेल्या या सत्रात प्रणय प्रभू गावकर यांनी पेटन्ट, कॉपीराईट, ट्रेडमार्क, मूळ कल्पना आणि नाविन्यता यांचे संरक्षण करण्यासाठी बौद्धिक संपदा हक्क कायदा कशाप्रकारे वापरला जाऊ शकतो, यावर भाष्य केले. उद्योजकता ही गरज आणि मानसिकता बनली पाहिजे. व्यावसायिक उपक्रमांमध्ये सर्जनशीलता आणि समस्या सोडवण्यावर भर दिला पाहिजे, असेदेखील प्रणय प्रभू गावकर यांनी सांगितले. पेटन्ट आणि कॉपीराईट मिळविण्याची प्रक्रिया आणि त्यामागील खर्च यावर विश्लेषण केले.